गुरुवार, दि. २७ नोव्हेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ९४ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# अवैध लाल-काळा जुगाराचा विळखा घट्ट; सदर बाजार ठाणे पोलीसांची मैत्री स्पष्ट?

**दीपक शेळके**

**जालना-** शहरातील सदर बाजार पोलीस ठाणे हद्दीत लाल-काळा या अवैध जुगार खेळामुळे सामान्य नागरिक, शेतकरी अक्षरशः उध्वस्त होत आहेत. काही ठिकाणी सकाळी दहा वाजल्यापासून रात्रीपर्यंत हा जुगार खुलेआम सुरू असून पोलीस मात्र कारवाईऐवजी डोळेझाक करत असल्याची गंभीर चर्चा नागरिकांत आहे. नुकतीच एका शेतकऱ्याची तब्बल ३५ हजारांची फसवणूक झाल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

युवा आदर्शला मिळालेल्या माहितीनुसार, खेड्यातून शहरात आलेल्या एका शेतकऱ्याला लाल-काळा जुगार खेळवून मोठी रक्कम हरवली गेली. पैसे हरल्यानंतर त्या शेतकऱ्याने रडवेल्या स्वरात विनंती केली तरी त्याला एकही रुपया परत देण्यात आला नाही. उलट पोलिसांची केस होईल, आत जाशील अशी धमकी देत त्याला हाकलून दिल्याचे समोर आले. अशा अनेक घटना घडत असून त्या बाहेर येत नाहीत.

**पोलीस ठाण्याची भूमिका प्रश्नचिन्हात**

सदर बाजार पोलीस ठाणे हद्दीत चार-पाच ठिकाणी जुगाराचे अड्डे सकाळ-संध्याकाळ सुरू असताना गस्त पथकांना हा सर्व प्रकार कसा दिसत नाही? हीच नागरिकांची मोठी शंका आहे. दोन दिवसांपूर्वी काडतूस प्रकरणात पोलीसांनी दोन जणांना ताब्यात घेतले, मात्र ते काडतुस-पिस्तुल कुठून येते? पुरवठादार कोण? या प्रश्नांची उत्तरे मात्र कायम धुसर राहतात. यामुळे नागरिकांमध्ये ठाण्याची भूमिका बघ्याची बनल्याची टीका होते आहे.

पोलीसांनी तातडीने कोणती पावले उचलली पाहिजेत? सदर बाजार हद्दीत तात्काळ छापेमारी मोहिम ज्या ठिकाणी रोज लाल-काळा खेळ चालतो तिथे गुप्त पथकांनी अचानक धाडी मारणे आवश्यक आहे. यासंदर्भात स्थानिक नागरिक, दुकानदार, रिक्षाचालक, हॉटेलधारकांकडून माहिती मिळविणे आवश्यक आहे. जुगार खेळवणाऱ्या दलालांचा तपास करण्यासह अड्डे चालवणाऱ्यांची मूळ साखळी उखडणे, कोण पैसे गुंतवतो? कोण रेकॉर्ड ठेवतो? त्यामागे कोण प्रोटेक्शन देत आहे? ही संपूर्ण साखळी मोडणे आवश्यक आहे. नियमित गस्त आणि सीसीटीव्ही तपासणी, गस्त पथकांना निश्चित रूट देणे, संशयित गल्ली, चौकांची सीसीटीव्ही फुटेज तपासणी करण्याची आवश्यकता आहे. पोलीस अधिकक्षकांच्या विशेष पथकाकडून स्वतंत्र चौकशी होणे आवश्यक आहे.

सदर बाजार पोलीस ठाण्याच्या कार्यपद्धतीबाबत विभागीय पोलिसांनी स्वतंत्र चौकशी करणे ही काळाची गरज आहे.

**नागरिकांनी कोणती सावधगिरी बाळगावी?**

लाल-काळा, मटका, सट्टा यापासून दूर राहा, यात कमाई नसते, फक्त नुकसान होते. दलाल फक्त गरीब-शेतकऱ्यांची शिकार करतात. अशी ठिकाणी दिसल्यास तातडीने पोलिसांना कळवा १०० हेल्पलाईन नंबरवर फोन करुन माहिती द्या. जालना पोलिसांना किंवा थेट वरिष्ठ अधिकाऱ्यांना आर्थिक फसवणूक झाल्यास त्वरित तक्रार द्या. भीती बाळगू नका - जुगार खेळवणे हा गुन्हा आहे; पण जबरदस्ती, फसवणूक, धमकी यांना कायदा संरक्षण देतो. विशेष करून खेड्यातील नागरिकांनी जागरूक राहावे. अनोळखी व्यक्तीचे लाल-काळाचे लुभावणारे सल्ले टाळा. हा खेळ फक्त हरायला लावतो.

अवैध लाल-काळा जुगारामुळे अनेक कुटुंबे आर्थिक संकटात सापडत आहेत. पोलीसांनी तातडीने कठोर मोहिम राबवणे आवश्यक आहे; तसेच नागरिकांनीही जागरूक राहून माहिती दिल्यास हा अवैध उद्योग मोठ्या प्रमाणात रोखता येऊ शकतो.

## पोलीस अधिक्षक साहेब मनपा आयुक्तांचा कित्ता गिरवा...

दोन दिवसांपुर्वीच जिल्हाधिकारी तथा जालना शहर महानगर पालिकेच्या आयुक्त असलेल्या आशिमा मित्तल यांनी महानगर पालिकेत पत्रकारांची भेट घेऊन जालना शहर स्वच्छ व आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या दृष्टिने काय पाऊले उचलण्यात येतील याबाबत चर्चा केली. जिल्हाधिकारी असतांनाही आयुक्त पदाचा अतिरिक्त कारभार सांभाळणाऱ्या आशिमा मित्तल यांनी पोटतिकडीने प्रश्न मांडत जालन्यातील महानगर पालिकेतील समस्यांवर तोडगा काढण्यासाठी पत्रकारांसह जनतेला आवाहन केले. याच पद्धतीने पोलीस अधीक्षकांनीही त्यांचा कित्ता गिरवित अवैध धंद्याची माहिती देण्यासाठी विशेष पोलीस पथकाची नियुक्ती करण्याची गरज निर्माण झालेली आहे. या पथकातील पोलीसांचे मोबाईल नंबर सार्वजनिक करुन त्यांना अवैध धंद्यांबाबत माहिती द्यावी असे आवाहन पोलीस अधिक्षकांनी करणे आता गरजेचे झाले आहे.

## पोलीस अधिक्षक साहेब सदर बाजार पोलीसांची कार्यशाळा घ्या...

महाराष्ट्र प्रतिबंधक जुगार अधिनियम, १८८७ नुसार पोलिसांना मोठ्या प्रमाणात अधिकार आहेत : १) जुगार चालवणाऱ्यावर कारवाई जुगाराचा अड्डा चालविणे हा गंभीर गुन्हा, जास्तीत जास्त ३ वर्षांपर्यंतची शिक्षा, मोठी दंडात्मक रक्कम, जागा भाड्याने देणाऱ्या व्यक्तीवरही गुन्हा दाखल शक्य, २) जुगार खेळणाऱ्यावर कारवाई प्रथम गुन्हा : दंड / अल्प शिक्षा, वारंवार गुन्हा : कठोर शिक्षा, जामीन कठीण, **अधिकार** कारवाईसाठी वॉरंटची गरज नाही, संशयित ठिकाणी छापा, साहित्य जप्ती, आरोपी ताब्यात, आर्थिक प्रवाह, मोबाईल व्यवहारांची चौकशी, जुगारासाठी वापरल्या जाणाऱ्या ठिकाणांची सीलिंग, लाल-काळा, मटका, सट्टा या सर्वांची ऑनलाइन देणारे, नंबर चालवणारे यांच्यावरही गुन्हा दाखल करता येतो. या माहितीतही काही कमी जास्त असेल तर पोलीस अधिक्षक साहेब सदर बाजार पोलीसांची कार्यशाळा घ्या. त्यांना अवैध धंद्यांवर कारवाई करण्यासाठी असलेले कायदे-नियम समजवण्याची नितांत आवश्यकता आहे.

युवा आदर्श

**जुळावी ...**

नोकरी मलई पोस्टिंग
अग्दी सहज मिळावी
माझ्या केशसांभारात
सुगंधी फुले माळावी
प्रत्येक गोष्ट भागिदारी
दत्त आश्वासने पाळावी
इतरांच्या पोळी वरची
मलई आम्हीचं पळवी
आडवी येणारी मंडळी
अंधारात नीट लोळवी
चौकशा लावूनि पाठी
जंजाळा सारी घोळवी
पोटे आमची मोठाली
बाकीचे होतात हळवी
परसेंटेजची समिकरणे
गणिते बरोबर जुळावी
धाडी पाडण्या आधीचं
माहिती आम्हां कळावी
सापळ्या चिल्ले पिल्ले
पाऊले अन्यत्र वळावी
कारवाई हो विचारून
ईडीपिडा वेळीटाळावी
साटे लोटे ते लांब लोटे
बाहेर आधीचं पिटाळी
अतृप्तआत्मे संतुष्टावी
बाहेर न यावी घोटाळी
मिंधी करायची मंडळी
आपलेपायाशीघोटाळी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## मतदार याद्यांतील त्रुटी दूर करून हरकती व दावे दाखल करण्यासाठी मुदतवाढ द्यावी- भास्कर दानवे

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिका निवडणूक २०२५ करिता प्रसिद्ध झालेल्या १६ प्रभागांच्या प्रारूप मतदार याद्यांमध्ये मोठ्या त्रुटी आढळून आल्याने दुरुस्ती व हरकती, दावे दाखल करण्यासाठी मुदतवाढ देण्याची मागणी माजी आमदार कैलास गोरंटयाल व भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांच्या वतीने जालना महानगराच्या वतीने जिल्हाधिकारी, जालना व आयुक्त, जालना शहर महानगरपालिका यांच्याकडे निवेदनाद्वारे आज करण्यात आली.

भास्कर दानवे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जालना महानगरपालिकेतील सर्व १६ प्रभागांच्या प्रारूप मतदार याद्यांची प्रभागनिहाय व घरक्रमांकनिहाय पुनरपडताळणी करावी, प्रभागाबाहेरील व्यक्तींची नावे त्वरित सदर प्रभाग याद्यांतून वगळावीत व प्रत्यक्ष वास्तव्यास असलेल्या प्रभागात त्यांची नावे समाविष्ट करावीत. मतदार पडताळणी प्रक्रियेत बी.एल.ओ. यांनी प्रत्यक्ष स्थळभेट देऊन आधार दस्तऐवजांच्या आधारे शहानिशा करावी, आवश्यक पुरावे सादर केल्यास पात्र व्यक्तींची नावे नवीन मतदार म्हणून समाविष्ट करण्यात यावीत, मयत झालेल्या मतदारांची नावे मतदारयादीतून वगळण्यात यावीत, पुनरपडताळणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच सुधारित मतदार यादी प्रकाशित करावी, तसेच हरकती व दावे दाखल करण्यासाठी निश्चित मुदतवाढ देण्यात यावी. यावेळी विजय कामड, सिद्धिविनायक मुळे, देविदास देशमुख, महेश निकम, अमोल धानुरे, विजय पवार, कपिल दहेकर, मनोज इंगळे, रोहित नलावडे आदींची उपस्थिती होती.



## घरावर सोलार असूनही परतूरच्या ग्राहकाला महावितरणने पाठवले शॉक देणारे बिल

### ग्राहक आंदोलनाच्या पवित्र्यात

**परतूर । प्रतिनिधी -** महावितरणच्या गलथान कारभाराचा आणि मनमानी बिलिंगचा आणखी एक धक्कादायक प्रकार परतूर शहरात उघडकीस आला आहे. गोकुळनगर येथील रहिवासी रामेश्वर हरिभाऊ सवणे यांना त्यांच्या घरावर सोलार यंत्रणा बसवलेली असतानाही महावितरणने तब्बल ८४,६३० रुपये इतके प्रचंड वीज बिल पाठवले आहे. या चुकीच्या बिलामुळे संतापलेल्या ग्राहकाने महावितरण कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा आणि थेट ग्राहक मंचात दाद मागण्याचा इशारा दिला आहे.

रामेश्वर सवणे ग्राहक क्र. ५२४०११७१२२४९ यांनी वीज बचत करण्यासाठी आपल्या राहत्या घरावर तीन महिन्यांपूर्वी सोलार यंत्रणा बसवली. सोलार बसवल्यानंतर वीज बिलात मोठी बचत होईल अशी त्यांची अपेक्षा होती, परंतु महावितरणच्या चुकीच्या कार्यप्रणालीमुळे त्यांच्या अपेक्षांवर पाणी फेरले आहे.

ग्राहकांच्या म्हणण्यानुसार, त्यांचे मागील तीन महिन्यांपासून वाढीव बिल येत आहे. पूर्वी त्यांनी सुमारे ५० हजार रुपयांचे बिल भरलेले असतानाही, आता चालू बिल म्हणून त्यांना थेट ८४,६३० रुपये एवढी मोठी रक्कम भरण्यास सांगण्यात आले आहे. हे बिल भरण्याची अंतिम तारीख ११ डिसेंबर २०२५ आहे.

सवणे यांनी तक्रारीत स्पष्ट केले आहे की, त्यांच्या घरी झालेला वीज वापर एवढा नाही. विशेष म्हणजे, त्यांच्या सोलार यंत्रणेतून महावितरणच्या ग्रीडमध्ये जमा झालेल्या युनिट्सची कोणतीही नोंद बिलामध्ये घेण्यात आलेली नाही. त्यामुळे बिलाची रक्कम अवास्तव आणि पूर्णपणे चुकीची आहे.

**आंदोलन आणि ग्राहक मंचात जाण्याचा इशारा**

महावितरणचे सहाय्यक अभियंता, परतूर यांना दिलेल्या लेखी अर्जात रामेश्वर सवणे यांनी मागणी केली आहे की,

महावितरणने आठ दिवसांच्या आत या बिलाची दुरुस्ती करावी. अन्यथा, ते महावितरण कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करतील. तसेच, न्याय न मिळाल्यास ते ग्राहक मंचात किंवा थेट न्यायालयात जाऊन दाद मागतील, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला आहे.

## कृषी उत्पन्न बाजार समिती कुंभार-पिंपळगाव येथे कापूस खरेदी केंद्र तात्काळ सुरू करण्याची भाजपची मागणी



**जालना । प्रतिनिधी -** राणीउंचेगाव ता.घनसावंगी जि.जालना येथे सी.सी.आय. कापूस खरेदी केंद्र तात्काळ सुरू करण्यात यावे, अशी मागणी भारतीय जनता पार्टीच्या वतीने कुंभार-पिंपळगाव कृषी उत्पन्न बाजार समितीकडे करण्यात आली.

भाजपचे जिल्हा सरचिटणीस गोविंद ढेंबरे, माजी पंचायत समिती सदस्य प्रभाकर धांडे, अ.जा.मो. जिल्हा सरचिटणीस किरण गुढेकर, चापडगावचे सरपंच गजानन टेकाळे, ज्येष्ठ कार्यकर्ते मुरलीधर मामा शिंदे, जिल्हा कार्यकारिणी सदस्य बाबासाहेब हरबक, सोशल मीडिया प्रभारी कृष्णा लोकरे व तुषार सुळे यांच्या उपस्थितीत सचिवांना निवेदन देण्यात आले.

शेतकऱ्यांना कापूस विक्रीत अडचणी येत असल्याने सी.सी.आय केंद्र तातडीने सुरू करण्याची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या मागणीची प्रत पालकमंत्र्यांनाही पाठवण्यात आली असून कापूस खरेदी केंद्र सुरू झाल्यास शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

## संपादकीय पान

# पडद्यावरील ही मॅन काळाच्या पडद्याआड

१९६० ते १९८० हा काळ हिंदी चित्रपटसृष्टील सुवर्णकाळ समजला जातो. या सुवर्णकाळाने हिंदी चित्रपट सृष्टीला एका पेक्षा एक असे अनेक महान कलाकार दिले. या कलाकारांनी आपल्या अभिनयाने हिंदी चित्रपट सृष्टीला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. आता मात्र या सुवर्ण काळाचे साक्षीदार असलेले महान कलाकार एक एक करून आपल्याला सोडून चालले आहेत. असेच एक महान कलाकार ज्यांनी आपल्या अभिनयाने आणि देखणेपणाने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले ते हिंदी चित्रपट सृष्टीतील एक महान कलाकार धर्मेंद्र हे ही प्रेक्षकांना कायमचे सोडून गेले. अभिनेते धर्मेंद्र यांनी सोमवारी, २४ नोव्हेंबर रोजी वयाच्या ८९ व्या वर्षी वृद्धापकाळाने अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने चित्रपट सृष्टीवरच नव्हे तर एकूणच मनोरंजन विश्वावर शोककळा पसरली. ८ नोव्हेंबर १९३५ रोजी जन्मलेल्या धर्मेंद्र यांनी जवळपास पाच दशकांहून अधिक काळ आपल्या अभिनयाने प्रेक्षकांना मोहित केले. १९६० साली अभिनय क्षेत्रात पदार्पण केलेल्या धर्मेंद्र यांनी जवळपास ३०० हून अधिक चित्रपटात भूमिका केल्या . दिल भी तेरा हम भी तेरे हा त्यांचा पहिला चित्रपट. त्यांच्या पहिल्याच चित्रपटाला चांगले यश मिळाले. राजबिंडा चेहरा आणि मोहक हास्य आणि पिळदार शरीरयष्टी यामुळे त्यांना अनेक रोमँटिक भूमिका मिळाल्या. कारकिर्दीच्या सुरुवातील एक रोमँटिक हिरो म्हणून त्यांनी मोठा पडदा गाजवला. मीना कुमारी, सायरा बानू, शर्मिला टागोर, आशा पारेख, माला सिन्हा, परवीन बाबी, हेमा मालिनी, रीना रॉय, राखी, जया प्रदा या त्या काळातील सर्व मोठ्या अभिनेत्रींसोबत त्यांनी स्क्रीन शेअर केली. पुढे त्यानी क्शनपटात भूमिका केल्या. १९७६ ते १९८४ या काळात त्यांनी अनेक त्यांनी क्शनपट केले. धर्मेंद्र मोठ्या पडद्यावर गुंडांबरोबर नेहमीच दोन हात करत म्हणून त्यांची गरम - धरम आणि ही मॅन अशी ओळख निर्माण झाली. ही मॅन ही बिरुदावली तर त्यांना कायमची चिकटली म्हणूनच त्यांच्या निधना नंतर पडद्यावरचा ही मॅन काळाच्या पडद्याआड गेला अशी बातमी टीव्ही चॅनलवर झळकली. धर्मेंद्र यांनी त्या काळातील सर्व महान दिग्दर्शकांसोबत काम केले. बिमल रॉय, जे पी दत्ता, मोहन कुमार, राजकुमार कोहली, राज खोसला, रमेश सिप्पी या दिग्दर्शकांनी त्यांना आपल्या चित्रपटात नेहमीच संधी दिली. अर्जुन हिंगोरानी यांच्या जवळपास सर्व चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या. हकिकत, ममता, अनुपमा, आये दीन बहार के, मेरे हमदम मेरे दोस्त, इज्जत, आँखें, सत्यकाम, आया सावन झुमके, जीवनमृत्यू, मेरा गाव मेरा देश, सीता और गीता, यादोंकी बारात, चुपके चुपके, शोले, धरमवीर, ब्लॅकमेल, जुगणू, कलाकार, दिल्लगी, द बर्निंग ट्रेन, राम बलराम, गुलामी, हुकूमत, बटवारा, क्षत्रिय, जॉनी गद्दार हे आणि यासारखे त्यांनी अभिनय केलेले अनेक चित्रपट गाजले त्यातील त्यांच्या भूमिका प्रेक्षकांना खूप भावल्या. त्यांच्या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय ठरली. त्यांनी अभिनय केलेल्या शोले या चित्रपटाने तर इतिहास घडवला. या चित्रपटात त्यांनी साकारलेल्या वीरू या पात्राने तर जवळपास चार पिढ्यांवर अधिराज्य गाजवले. शोले आणि त्यातील जय वीरू याशिवाय हिंदी चित्रपट सृष्टीचा इतिहासच पूर्ण होऊ शकत नाही. शोले चित्रपटाची शूटिंग चालू असतानाच ते हेमा मालिनीच्या प्रेमात पडले आणि पुढे दोघांनी लग्न केले. अभिनेते धर्मेंद्र यांनी केवळ हिंदीच नव्हे तर पंजाबी चित्रपटातही भूमिका केल्या. त्यांनी एका मराठी चित्रपटातही भूमिका केली. अभिनेते धर्मेंद्र यांनी काही चित्रपटाची निर्मितीही केली. सनी देवल आणि बॉबी देवल या आपल्या मुलांसाठी त्यांनी अनुक्रमे बेताब आणि बरसात या चित्रपटांची निर्मिती केली. अभय देवल या आपल्या भाच्यासाठीही त्यांनी सोचा न था या चित्रपटाची निर्मिती केली. पुढे त्यांनी राजकारणातही प्रवेश केला. २०१४ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी राजस्थान मधील बिकानेर मधून भाजप कडून निवडणूक लढवली आणि जिंकली पण राजकारण हा आपला प्रांत नाही हे लक्षात येताच त्यांनी राजकारणातून निवृत्ती स्वीकारीत पुन्हा आपला मोर्चा अभिनयाकडे वळवला. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. २०१२ साली भारत सरकारने त्यांना पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांना गौरविले. जवळपास पाच दशकांहून अधिक काळ चित्रपट सृष्टीवर आणि प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा हा महान कलाकार प्रेक्षकांना सोडून गेला. त्यांचे जाणे अकाली नव्हते तरीही त्यांचे जाणे प्रेक्षकांसाठी चटका लावून जाणारे ठरले. अभिनेते धर्मेंद्र यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

## मंगळवारी साप्ताहिक बाजार बंद

**जालना । प्रतिनिधी -** राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणूक-२०२५ साठी दि. ४ नोव्हेंबर, २०२५ रोजी कार्यक्रम जाहीर केला आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आलेली आहे. कार्यक्रमानूसार अंबड, भोकरदन व परतूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ साठी दि.२ डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार आहे. तरी नागरिकांना मतदानाचा हक्क बजावता यावा याकरीता अंबड, भोकरदन व परतूर या शहरातील साप्ताहिक बाजार मंगळवार दि.२ डिसेंबर २०२५ रोजी संपुर्णतः बंद ठेवावेत तसेच खाजगी आस्थापनामधील कर्मचाऱ्यांना मतदानासाठी सुट्टी देण्यात यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

## जाफ्राबादेतील दिव्यांग लाभार्थ्यांना आवाहन

**जालना -** सामाजिक विशेष अर्थसहाय्य योजनेंतर्गत जाफ्राबाद तालुक्यात एकुण २० हजार ६७२ लाभार्थी आहेत. त्यापैकी दिव्यांग लाभार्थी १ हजार ३०३ असून युडीआयडी व आधार संलग्नीकरण ४०३ लाभार्थ्यांचे यशस्वीरित्या पुर्ण झाले आहे. जे अत्यंत कमी आहे. त्यामुळे जाफ्राबाद तालुक्यातील दिव्यांग लाभार्थ्यांनी आपले युडीआयडी क्रमांक असलेले दिव्यांग प्रमाणपत्र आणि ई- आधारकार्ड तहसील कार्यालयातील संजय गांधी विभागात स्वतः जमा करावेत, जर लाभार्थ्यांनी कागदपत्रे जमा केली नाही तर त्यांचा लाभ कायमचा बंद करण्याची कार्यवाही करण्यात येईल. असे आवाहन प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# न्यायालयीन दिरंगाई: 'न्यायव्यवस्थाही जबाबदार!'

## अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निकालातून महाराष्ट्राने धडा घ्यावा - ॲड. महेश धन्नावत

**जालना । प्रतिनिधी -** लोकशाहीच्या इतर स्तंभांप्रमाणे न्यायव्यवस्थाही जनतेला उत्तरदायी आहे. न्याय मिळण्यास होणारा विलंब हा न्याय नाकारण्यासारखाच आहे, असे स्पष्ट मत व्यक्त करत ड. महेश एस. धनावत यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयाने अलीकडेच दिलेल्या दोन महत्त्वपूर्ण निकालांकडे लक्ष वेधले आहे. या निकालांमधून बोध घेऊन महाराष्ट्रातील न्यायव्यवस्थेने, विशेषतः चेक बाऊन्सच्या प्रलंबित खटल्यांमध्ये, जलदगतीने न्याय देण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी त्यांनी केली आहे.अलाहाबाद उच्च न्यायालयाने दोन वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये खटले वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवणाऱ्या कनिष्ठ न्यायालयांच्या न्यायाधीशांना थेट जबाबदार धरून त्यांच्याकडून स्पष्टीकरण मागवले आहे. यावरून न्यायव्यवस्थेतील उत्तरदायित्वाचे महत्त्व अधोरेखित होते.

**अलाहाबाद उच्च न्यायालयाची कठोर भूमिका:** महमूद अहमद सिद्दीकी प्रकरण: या प्रकरणात, चेक बाऊन्सचा एक खटला २०१४ पासून प्रलंबित होता. उच्च न्यायालयाने २०२० आणि २०२३ मध्ये दोनदा तीन महिन्यांत खटला निकाली काढण्याचे आदेश दिले होते. तरीही आदेशांचे पालन न झाल्याने, उच्च न्यायालयाने संबंधित विशेष न्यायाधीश आणि जिल्हा व सत्र न्यायाधीश या दोघांनाही वैयक्तिक प्रतिज्ञापत्राद्वारे स्पष्टीकरण देण्याचे आदेश दिले. जिल्हा न्यायाधीशांनी देखरेख ठेवण्याच्या आदेशाचे पालन न केल्याबद्दलही त्यांना जबाबदार धरण्यात आले. हा खटला हस्तांतरित करण्यासाठी अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता १८९८ च्या कलम ४०७ (आता भारतीय नागरिक सुरक्षा संहिता -, २०२३) अंतर्गत दाखल करण्यात आला होता.

श्रीश कुमार मालवीय प्रकरण: या प्रकरणात, एका ७३ वर्षीय व्यक्तीवर दाखल असलेला खटला तब्बल २० वर्षांपासून सुरू होता, ज्यामध्ये कमाल शिक्षा केवळ सहा महिन्यांची होती. गेल्या १३ वर्षांपासून एकही साक्षीदार हजर झाला नव्हता. यावर न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त करत, जलद सुनावणीचा हक्क हा भारतीय संविधानाच्या कलम २१ नुसार नागरिकाचा मूलभूत हक्क आहे, असे नमूद केले. न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाला एका महिन्याच्या आत खटला निकाली काढण्याचा अल्टिमेटम दिला आणि तसे न केल्यास संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याचा इशाराही दिला.

**महाराष्ट्रातील विदारक चित्र:** ॲड. धनावत यांनी महाराष्ट्रातील परिस्थितीवर चिंता व्यक्त केली. ते म्हणाले, आज महाराष्ट्रात चेक बाऊन्सच्या प्रकरणांमध्ये होणाऱ्या विलंबामुळे सामान्य नागरिक आणि व्यावसायिक त्रस्त झाले आहेत. लोकांमध्ये अशी भावना निर्माण झाली आहे की, 'रोख व्यवहार काय किंवा चेकने व्यवहार काय, दोन्ही सारखेच! चेक बाऊन्स झाला किंवा केस दाखल केली तरी काहीच होत नाही, कारण खटला वर्षानुवर्षे चालतो आणि शिक्षा झाली तरी अपीलमध्ये वेळ जातो.' यामुळे कायद्याचा धाक कमी होत चालला आहे आणि आर्थिक व्यवहारांवरील विश्वास उडत आहे.

महाराष्ट्रात प्रलंबित असलेल्या निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स क्टखालील खटल्यांची प्रचंड संख्या पाहिली तर परिस्थितीची गंभीरता लक्षात येते. या दिरंगाईमुळे प्रामाणिकपणे व्यवहार करणाऱ्या पक्षाचे मोठे आर्थिक नुकसान होते.

**पोलीस यंत्रणेचे उत्तरदायित्व:** ॲड. धनावत पुढे म्हणाले, खटल्यातील दिरंगाईला केवळ न्यायालयीन प्रक्रियाच नव्हे, तर पोलीस यंत्रणेचा ढिसाळ कारभारही जबाबदार आहे. आरोपींना आणि साक्षीदारांना समन्स व वॉरंट वेळेवर बजावले जात नाहीत, त्यामुळे तारखांवर तारखा पडत राहतात. अलाहाबाद उच्च न्यायालयाने ज्याप्रमाणे न्यायाधीशांना जबाबदार धरले, त्याचप्रमाणे समन्स-वॉरंट बजावण्यात दिरंगाई करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांनाही जबाबदार धरण्याची वेळ आली आहे.

**विदुर नीतीचा संदर्भ:** या परिस्थितीवर भाष्य करताना ड. धनावत यांनी विदुर नीतीमधील एका श्लोकाचा उल्लेख केला:

सुलभाः पुरुषाराजन् सततं प्रियवादिनः ।
अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः ।।

अर्थ: हे राजन, सतत प्रिय (गोड) बोलणारे माणसे सहज मिळतात, परंतु अप्रिय पण हिताचे बोलणारे आणि ऐकणारे दोघेही दुर्लभ असतात.

ते म्हणाले, हीच गोष्ट न्यायव्यवस्थेलाही लागू होते. अनावश्यक तारखा देणे हे काही वकिलांना 'प्रिय' वाटू शकते, पण कठोर भूमिका घेऊन जलद न्याय देणे हे 'अप्रिय' असले तरी तेच जनतेच्या हिताचे आहे. न्यायव्यवस्थेने हे पथ्य पाळायलाच हवे.

शेवटी, ड. धनावत यांनी आवाहन केले की, अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निकालांनी एक आदर्श घालून दिला आहे. महाराष्ट्रातील न्यायव्यवस्थेने यातून प्रेरणा घेऊन प्रलंबित खटले जलदगतीने निकाली काढण्यासाठी एक यंत्रणा विकसित करावी, जेणेकरून सामान्य माणसाचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास दृढ होईल आणि 'न्यायदेवता' खऱ्या अर्थाने लोकांच्या मदतीला धावून येईल.

# बॉलीवूडचे देखनेपण हरपले..!

रुबाबदार, देखणे, व्यक्तिमत्त्व, दमदार संवादफेक भल्याभल्या गुंडांचा एकट्याने सामना करत त्यांना लोळवणारा नायक, भावनाप्रधान प्रियकर, शेतकरी अशा बहुरंगी, बहुढंगी प्रतिमेने थोडी थोडकी नव्हे तर तब्बल ६० वर्षे हिंदी चित्रपटसृष्टीवर आपल्या अभिनयाचे साम्राज्य निर्माण करणारा, चित्रपट रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा, प्रचंड लोकप्रिय अभिनेता धर्मेंद्र यांनी अखेर जगाचा निरोप घेतला आणि त्यांचे चार पिढ्यांचे कोट्यवधी रसिक हळहळले. गेले महिनाभर त्याची मृत्यूशी अखेरची झुंज सुरू होती. वयाच्या ८९ व्या वर्षात सुरू झालेली ही झुंज अखेर वृध्दापकाळने, त्याच्या प्रकृतीने साथ न दिल्याने संपली. तो उपचारासाठी रुग्णालयात असतानाच त्याच्या मृत्यूच्या अफवाही पसरल्या होत्या. अखेर त्याने वयाच्या ८९ व्या वर्षी जगाचा निरोप घेतला. अखंड भारतातल्या ब्रिटिशकालीन पंजाब राज्यातल्या लुधियाना जिल्ह्यात जन्मलेल्या धर्मेंद्रचे मूळ नाव कृष्ण देओल. शिक्षणानंतर आपल्या शेतीत राबणाऱ्या कृष्णला नियतीने हिंदी चित्रपटसृष्टीत आणले. १९६० मध्ये हिंदी चित्रपटसृष्टीत प्रदार्पण केलेल्या कृष्णचे नाव धर्मेंद्र असे झाले आणि त्याच नावाने आपल्या सुरेख, सकस अभिनयाच्या बळाने तो लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचला. हिंदी चित्रपटसृष्टीतल्या २६० च्या वर चित्रपटात नायक, सहनायक आणि अगदी चरित्र नायकाच्या भूमिकाही त्याने जीवन ओतून साकारल्या. कोणतीही भूमिका लहान मोठी न समजता त्या भूमिकेला त्याने आपल्या अभिनयाच्या बळावर न्याय दिला. हाणामारीच्या चित्रपटाचा तर तो नायकच होता. शोले, चुपके चुपके, दादागिरी, दिल्लगी, जीवन-मृत्यू, सत्यकाम, अनुपमा, किनारा, स्वामी या त्याच्या चित्रपटातल्या भूमिका प्रचंड गाजल्या. गेली ५० वर्षे चार पिढ्यांच्या चित्रपट रसिकांवर लोकप्रियतेचे गारूड घालणाऱ्या शोले चित्रपटाच्या चित्रीकरणाच्या वेळी त्याचे हेमामालिनीशी प्रेम जुळले आणि विवाहित असतानाही त्याने तिच्याशी विवाह केला. तो गाजलाही. चित्रपटसृष्टीतला अभिनय हा त्याचा श्वास आणि ध्यास होता. या माया नगरीत प्रदीर्घ काळ राहून प्रचंड पैसा, कीर्ती, संपत्ती मिळाल्यावरही त्याचा साधेपणा शेवटपर्यंत कायम राहिला. हिंदी चित्रपटात सामान्य माणसाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या नायकाच्या भूमिका त्याने विलक्षण ताकदीने साकार केल्यानेच चित्रपट रसिकांचा तो लाडका नायक ठरला. आपल्या मुलांना चित्रपटसृष्टीत आणण्यासाठी त्याने स्वतःची चित्रपट निर्मितीची संस्था सुरू केली आणि मुलांचे हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पणही केले. सनी देओल आणि बॉबी देओल ही त्याची मुले आपल्या अभिनयाच्या बळावर लोकप्रिय झाली.बसंती इन कुत्तो के सामने मत नाचना। हा शेलोमधला त्याचा संवाद प्रचंड गाजला तर अन्य चित्रपटातीलही त्याचे संवाद अजरामर झाले. जीवनाच्या उत्तरार्धात मायानगरीतला झगमगाट, प्रसिध्दी, लौकिक हे सारे सोडून धर्मेंद्र लोणावळ्याजवळच्या आपल्या शेतात आपली पहिली पत्नी प्रकाश कौर यांच्यासह शांतपणे शेतकऱ्याचे जीवन जगत होता. काही काळ तो खासदारही होता. पण राजकारणात तो रमला नाही. राजकारण सोडून तो पुन्हा शेतकरी झाला. काळ्या मातीत राबणे, गाई-म्हशींच्या सहवासात राहणे आणि सेंद्रिय शेतीत प्रयोग करणे हेच त्याच्या जीवनाच्या उत्तरार्धातले जीवन होते. हाडाचा शेतकरी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतला अभिनायक असलेला धर्मेंद्र जगाचा निरोप घेऊन गेला असला तरी चित्रपटाच्या अभिनयाने तो चिरंजीवच आहे. हिंदी चित्रपटसृष्टीतील 'ही-मॅन' धर्मेंद्र यांनी २००४ मध्ये भाजपच्या तिकिटावर बिकानेरहून लोकसभेची निवडणूक जिंकली होती. या ज्येष्ठ अभिनेत्यावर २००४ मध्ये भाजपच्या स्विंग इंडिया मोहिमेचा खूप प्रभाव पडला. त्यानंतर त्यांनी राजकारणात प्रवेश केला. शत्रुघ्न सिन्हा यांच्यासोबत त्यांनी भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांची भेट घेतली. या भेटीतून त्यांच्या राजकीय प्रवासाची सुरुवात झाली. भाजपने धर्मेंद्र यांना राजस्थानमधील बिकानेर येथून उमेदवारी दिली. त्यांच्या लोकप्रियतेच्या जोरावर, धर्मेंद्र यांनी कॉँग्रेसच्या रामेश्वर लाल दुडी यांचा जवळजवळ ६०,००० मतांनी पराभव केला आणि संसदेत त्यांची जागा मिळवली. त्यानंतर पाच वर्षांनी त्यांची राजकीय कारकीर्द निराशेत बदलली. त्यांनी पुन्हा कधीही निवडणूक न लढवण्याची शपथ घेतली.

**ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.मासा बेलेवाडी, कागल-कोल्हापूर.९८६७७३२५०४**

# माणूस एवढा स्वार्थी का बनलाय?

एकेकाळी माणूस पृथ्वीतलावर निस्वार्थ प्राणी म्हणून ओळखला जात होता. गरजू, निराधार व संकटात सापडलेल्या व्यक्तीला निस्वार्थ भावनेने आर्थिक मदत करायचा. आपल्या माणसांना खूप खूप जपायचा व जीव लावायचा. ज्या मुलीच्या बापाची आर्थिक परिस्थिती भक्कम नाही, त्या मुलीच्या लग्नाच्या खर्चाला हातभार लावायचा. ज्या मुलाची आर्थिक परिस्थिती कमजोर आहे अशा मुलाच्या शिक्षणाचा खर्च उचलायचा. गरीब व शेतकरी भावाला नोकरदार भाऊ आर्थिक मदत करून त्याची परिस्थिती भक्कम करायचा. भावाच्या मुलींच्या लग्नाला फुल नाही तर फुलाची पाकळी का होईना पण आर्थिक मदत करायचा. नोकरदार भाऊ आपल्या नावाची सर्व जमीन गरीब भावाला देऊन मोकळा व्हायचा. सार्वजनिक कार्यात निस्वार्थ भावना ठेवून हिरीरीने भाग घ्यायचा. मित्रांना, नातेवाईकांना, समाज बांधवांना व गोरगरीब निराधारांना सढळ हाताने आर्थिक मदत करून माणुसकीचा धर्म पाळायचा. म्हणजे एकेकाळी माणसात माणुसकी ठासून भरली होती, माणसात माणुसकीचे सर्व गुणधर्म ठळकपणे दिसायचे. वृद्ध आई-वडिलांना आपल्याकडे ठेवण्यासाठी प्रत्येक मुलाची तळमळ दिसायची. परंतु जसजसा काळ बदलला तसा माणूस देखील बदलला. काळाच्या ओघात माणसांमध्ये असणारे माणुसकीचे सर्व गुणधर्म नष्ट होऊन माणूस स्वार्थी व मतलबी बनला. केवळ स्वतः पुरताच विचार करून जगू लागला. आपली मुले व बायको यांना घेऊन व आई-वडिलांना अंतर देऊन कुठेतरी लांब शहरी भागात नोकरीच्या ठिकाणी जाऊन आपला संसार थाटू लागला. गावाकडे आई-वडील व शेतकरी भाऊ कोणत्या परिस्थितीत जीवन जगत आहेत? त्यांची आर्थिक व कौटुंबिक परिस्थिती कशी आहे? याचा कोणताच विचार न करता नोकरदार मुले आई-वडिलांना व शेतकरी भावांना सोडून शहरी भागात नोकरीच्या ठिकाणी बायको लेकरांना घेऊन मोठ्या आनंदाने संसार थाटत आहेत. आईवडील कोणत्या परिस्थितीत जीवन जगत आहेत? त्यांना आपल्या आधाराची व आर्थिक मदतीची गरज आहे का? याचा विचार न करता ते बिनधास्त जीवन जगत आहेत. म्हणजे माणसात स्वार्थ बोकाळल्यामुळे माणूस स्वार्थी व मतलबी बनला आहे. तो फक्त आणि फक्त स्वतःचाच विचार करून जगत आहे. स्वतःची बायको आणि मुले आनंदात राहिले म्हणजे सर्व काही चांगले आहे, असा त्यांचा गैरसमज झाला आहे. खरेतर नोकरदार भावाने घराचा हिस्सा व शेताचा हिस्सा गरीब शेतकरी भावाला देऊन माणुसकी दाखवली तर खरंच माणसात कुठेतरी माणुसकी जिवंत असल्याचं एक उत्तम उदाहरण देता येईल. नोकरदार भावापेक्षा शेतकरी भावाचा आई-वडिलांना पालनपोषण करण्यात मोलाचा वाटा असतो. घराच्या व शेताच्या वाटणीवरून थोड्याफार जागेसाठी भाऊ-भावासोबत तीव्र रोशाने भांडताना दिसत आहे. कोणताच भाऊ कोणत्याच भावाला गुंठाभर जमीन देखील जास्त सोडायला तयार नाही. एवढा स्वार्थ माणसांमध्ये उफाळून आला आहे. स्वार्थापायी माणसे कोणत्याही थराला जाऊन आपल्याच माणसासोबत कुटील कटकारस्थान रचून स्वतःचा स्वार्थ साधून घेत आहेत. सख्ख्या भावासोबत टोकाचे वैर धरून त्याला संपवण्याचा कुटील डाव रचत आहेत. म्हणजे आजकालचा माणूस कोणत्याही थराला जाऊन नको ते कृत्य करून माणुसकीला काळीमा फासत आहे. प्रत्येकजण स्वतःचे कसे भले होईल याचा विचार करत आहे. एवढा कमालीचा स्वार्थ माणसात बोकाळला आहे. स्वार्थापायी माणूस माणसाची किंमत करायला तयार नाही. सख्ख्या भावासोबत थोड्याफार जमिनीसाठी भांडण तंटे करत आहे. एकेकाळी माणसात ठळकपणे दिसणारी माणुसकी आता नष्ट होऊन माणसात सैतानी गुणांनी प्रवेश केला आहे. माणूस माणसासारखे न वागता रानटी पशुप्रमाणे वागत आहे. आजकालच्या माणसाची नीतिमत्ता गढूळ पाण्यासारखी कलुषित झाली आहे. माणसाला स्वतःचेच भले व्हावे आणि दुसऱ्यांचे वाईट व्हावे असे वाटत आहे. मोठा आजार झाला तर दुसऱ्याला व्हावा आपल्याला होऊ नये अशी माणसाची नियत बनली आहे. काही पालक शाळेत गेल्यावर शिक्षकांना म्हणतात की, केवळ माझ्याच मुलाकडे लक्ष द्या, त्याच्याकडून चांगला अभ्यास करून घ्या, असे शिक्षकांना वारंवार सांगतात. परंतु दुसऱ्यांच्या मुलांचे ही चांगले व्हावे ही भावना त्यांच्या मनात नसते. म्हणजे माणसात स्वार्थ किती उफाळून आलाय हे आपल्याला दिसते. स्वतःचा मुलगा मोठ्या जागेवर अधिकारी म्हणून रुजू व्हावा परंतु स्वतःच्या भावाचा मुलगा साधा चपराशी देखील होऊ नये अशी भावना लोकांची बनली आहे. काही माणसे स्वतःच्या मुलीला चांगले स्थळ मिळावे म्हणून खूप खूप प्रयत्न करतात. नोकरदार मुलगा शोधतात आणि धुमधडाक्यात लग्न लावून देतात. परंतु भावाच्या मुलीला असेच चांगले स्थळ मिळावे म्हणून प्रयत्न करताना कोणताच भाऊ दिसत नाही. अडाणी भावाला शेतीवर मिळणाऱ्या स्कीम कशा उचलायच्या आणि त्याचा लाभ कसा घ्यायचा? हे काही माहीत नसते. तेव्हा शिकलेल्या भावाने अडाणी भावाला स्कीमचा लाभ घेण्यासाठी मदत करणे हे खऱ्या अर्थाने परम कर्तव्य असते परंतु कोणताच भाऊ अडाणी भावाला शेतीच्या स्कीमचा लाभ घेण्या संबंधी मार्गदर्शन करत नाही. फक्त स्वतःचा फायदा करायचा आणि स्वतःच्या बायको मुलांना घेऊन मजेत राहायचे हेच सूत्र आजकालच्या लोकांनी अवलंबले आहे. केवळ स्वतःचा स्वार्थ पाहणे आणि दुसऱ्यांचे काही का होईना ही लोकांची भावना बनली आहे. स्वार्थापायी माणूस माणसात राहिला नाही. स्वतःचा स्वार्थ पाण्यासाठी माणूस कोणत्याही थराला जाऊन कोणतेही नीच काम करू लागला आहे. सख्ख्या भावासोबत वैर धरून गुंठाभर जमिनीसाठी त्याला जीवे मारत आहे. प्रत्येक जण स्वार्थी बनला आहे. स्वार्थ साधण्यासाठी मुली सुद्धा काही मागे नाहीत. पतीची प्रॉपर्टी असताना सुद्धा बापाच्या प्रॉपर्टीत भाग घेण्यासाठी बऱ्याच मुली उतावीळ आहेत. याचाच परिणाम म्हणून प्रत्येक नात्यात दुरावा व कटूता निर्माण झाली आहे. माणसांमध्ये एवढा कमालीचा स्वार्थ वाढण्यास कारणीभूत आई-वडील आहेत. कारण आई-वडील आपल्या मुलांना चांगले संस्कार देत नाहीत. मुलांना आपुलकीने व प्रेमाने राहिला सांगत नाहीत. बरेच आई-वडील आपल्या मुलांना जन्म दिल्यावर काही दिवसांनी वाऱ्यावर सोडून देतात. त्यांच्यावर योग्य वेळी संस्काराचा थोडाही पाऊस पाडत नाहीत. पुढे चालून तीच मुले नात्याचे महत्त्व विसरून जातात आणि स्वार्थी व मतलबी बनतात. या आधुनिक युगात स्वार्थ वाढण्यामागे कारण म्हणजे माणसांमध्ये संस्कार रुजवणारे व त्यांना संस्काराची शिदोरी देणारे वृद्ध माणसे अस्तित्वात राहिले नाहीत. त्यामुळे आजकालच्या मुलांवर संस्कार रुजवणे अवघड झाले आहे. अति लाडामुळे व संस्काराच्या अभावामुळे मुले बिघडत चालली आहेत. त्यांच्यात स्वार्थी भावना वाढीस लागत आहे. स्वार्थ उफाळल्यामुळे माणूस माणसासारखे वर्तन न करता रानटी पशु प्रमाणे वागत आहे. स्वार्थापायी रक्ताची नाती तटातट तोडत आहे. दुसऱ्याचे काही का होईना पण आपल्या परिवाराचे चांगलेच व्हावे अशी स्वार्थी भावना माणसाची बनली आहे. जाता जाता मला समस्त मानव जातीला नम्रतेची विनंती करावी वाटते की, बांधवांनो एवढा स्वार्थ व मतलब काही कामाचा नाही. स्वार्थापायी कोणत्याही थराला जाऊन कोणतेही टोकाचे निर्णय घेण्यात काही अर्थ नाही. केवळ स्वतःचे भले व्हावे ही स्वार्थी भावना ठेवून जर तुम्ही वागत असाल तर तुमचे वाईटच होणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे. स्वार्थी माणसाला जास्त मित्र नसतात. नातेवाईक, भावकी, मित्र परिवार व सगेसोयरे त्यांना बोलत नाहीत. त्यांच्यासोबत त्यांचे पक्के वैर असते. स्वार्थी माणसाने कितीही स्वार्थ बाळगून स्वतःचे हित पाहण्याचा प्रयत्न केला तरी त्याचे भले काही होत नाही, शेवटी वाईटच होत असते म्हणून स्वार्थ सोडून द्या, निस्वार्थ जीवन जगण्यात व इतरांना मदत करण्यात आगळावेगळा आनंद मिळतो. त्यासाठी गरज आहे, स्वार्थाला लाथ मारून माणसांना जवळ करण्याची व त्यांच्यासोबत माणुसकीने वागण्याची....

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# भारताचे संविधान म्हणजे लोकशाहीचे हृदय - जगत घुगे

## सेलगाव येथील पीएमश्री जिल्हा परिषद शाळेत संविधान दिन साजरा




**जालना । प्रतिनिधी -** भारताचे संविधान हे आपल्या देशाच्या लोकशाहीचे हृदय आहे. प्रत्येक भारतीयाने संविधानाचा अभ्यास केला पाहिजे. सरपंच ते पंतप्रधान निवडण्यापर्यंतचे अधिकार संविधान आणि दिलेले असून, संविधानातील तत्त्वांचे पालन करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन राजेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक जगत घुगे यांनी केले. पीएमश्री प्रशाला सेलगाव येथे भारताचा संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संविधान दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्ये, राष्ट्रप्रेम आणि संविधानाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जगत घुगे बोलत होते. व्यासपीठावर प्रशालाचे मुख्याध्यापक अरविंद खरात, राजेंद्र कायंदे, अशोक मुर्तडकर, प्रकाश आंबेकर यांची उपस्थिती होती. श्री. घुगे पुढे म्हणाले की, आजची पिढी ही ज्ञानपिपासू आणि उत्साही आहे. जर या पिढीने संविधान वाचले आणि समजून घेतले तर भविष्यात भारत अधिक सुशिक्षित, उत्तरदायी आणि प्रगत राष्ट्र म्हणून जगासमोर उभा राहील. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांकडे संविधानाची पुस्तिका असावी आणि ती वेळोवेळी वाचली जावी, असे ते म्हणाले. मुख्याध्यापक श्री. खरात यांनी संविधान दिनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागाचे कौतुक करत आगामी काळात अशा उपक्रमांचे आयोजन नियमितपणे करण्यात येणार असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संविधान प्रस्तावनेचे समूहवाचन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी संविधानाशी संबंधित घोषवाक्ये, भाषणे आणि देशभक्तिपर गीतांनी कार्यक्रमाला भारदस्त स्वरूप दिले. या कार्यक्रमास सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### संविधान दिन कार्यक्रम भाजपा जिल्हा कार्यालयात उत्साहात संपन्न

# राष्ट्रीय हितापेक्षा मोठे काहीही नाही, संविधान हेच आमचे मार्गदर्शक - माजी आ. गोरंटयाल

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय संविधान दिनानिमित्त भाजपा जिल्हा कार्यालय, जालना येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून संविधानाची सामूहिक शपथ घेण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमास माजी आमदार कैलासजी गोरंटयाल व भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांची प्रमुख उपस्थित होती.

या कार्यक्रमामध्ये २६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्यात जीव गमावलेल्या निष्पाप नागरिकांना व शहीद जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळून शहीद वीरांना आदरांजली वाहिली. यानंतर संविधान उद्देशिकाचे सामूहिक वाचन करण्यात आले. सर्वांनी संविधानातील मूल्यांचे रक्षण करण्याची व लोकशाही बळकट करण्याची शपथ घेतली.

माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी सांगितले की, संविधान हा केवळ कायद्यांचा दस्तऐवज नसून राष्ट्रनिर्मितीचा मार्गदर्शक आहे. आजच्या युवा पिढीने संविधानाचा अभ्यास करून देशाच्या प्रगतीमध्ये आपले योगदान देणे गरजेचे आहे. लोकशाही मजबूत करण्यासाठी सामाजिक ऐक्य, बंधुता आणि शांततेचे मूल्य जपले पाहिजे.

यावेळी भास्कर आबा दानवे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, भारतीय संविधान हे जगातील सर्वश्रेष्ठ व सर्वसमावेशक संविधान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामान्य माणसाला न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता या मूल्यांवर उभे राहण्याचा अधिकार दिला. संविधानाचे पालन करणे हे केवळ कर्तव्य नसून ती राष्ट्रसेवा आहे. संविधानातील विचारांची जपणूक करून ती पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे ही आपली जबाबदारी आहे असे त्यांनी सांगितले.

यावेळी भाजपा पदाधिकारी, नगरसेवक, मंडळ अध्यक्ष, बूथ प्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख, विविध आघाडी, सेल चे संयोजक, कार्यकर्ते व बंधू भगिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# शाळा बनली जणू बाजारपेठ

## आरदखेडा जि.प. शाळेत बाल आनंदनगरीला पालकांचा प्रतिसाद

**विशाल देशमुख**
**जाफराबाद -** तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, आरदखेडा येथे पार पडला. सकाळपासूनच शाळेच्या आवारात मुलांची लगबग दिसत होती. बाजारपेठेच्या धर्तीवर उभारलेल्या पाणीपुरी, गुलाबजामुन, भजे, पापड-चिवडा, पोहे, भाजीपाला, वही-पेन, पुस्तकांचे तसेच त्यांच्या गणिती कौशल्याचा, पैशांच्या व्यवहाराचा आणि संवादकौशल्याचा सुंदर सराव झाला. प्रत्यक्ष अनुभवातून



'आनंदायी शनिवार' अंतर्गत आयोजित बाल आनंदनगरी मेळावा मोठ्या उत्साहात आणि आनंदमय वातावरणात उभारलेल्या आकर्षक रंगीबेरंगी स्टॉलमुळे परिसर गजबजून गेला.

विद्यार्थ्यांनी स्वतः स्थानिक फळांचे स्टॉल विशेष लक्षवेधक ठरले. मुलांनी केलेली सजावट, विक्री आणि ग्राहकांशी संवाद यामुळे आत्मविश्वास वाढवणे हा या उपक्रमाचा उद्देश यशस्वी ठरल्याचे पालकांनी मत व्यक्त केले.

मेळाव्याला पालक, माता-पालक, गावातील मान्यवर व्यक्ती, युवा, शिक्षण प्रेमी आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शालेय समिती, मुख्याध्यापक विनोद घोडेस्वार, शिक्षक मधुकर उखर्डे, संदीप जाधव, सावता तिडके, सुनीता खलसे यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी अंगणवाडी सेविका शिंदे मॅडम, जया भिसे, उषा मगरे, संदीप दांडगे तसेच गावकरी यांची उपस्थिती लाभली.

पालकांनी अशा उपक्रमांमुळे मुलांना प्रत्यक्ष व्यवहारातून, हसत-खेळत आणि आनंदाने शिक्षण मिळते यामुळे शाळेची गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास निश्चितच वाढेल, अशी प्रशंसनीय प्रतिक्रिया दिली.

# 'चक्रव्यूह' कथासंग्रहाचा प्रकाशन सोहळा

**मंठा । प्रतिनिधी -** येथील प्रख्यात डॉक्टर, साहित्यिक आणि समाजप्रेमी डॉ. रमेश पंडितराव बोराडे यांच्या 'चक्रव्यूह' या नवीन कथासंग्रहाचे सेलू येथे मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशन सोहळा पार पडला. सेलू येथे नुकत्याच पार पडलेल्या पहिल्या अक्षर साहित्य संमेलनात झालेला हा सोहळा रसिकांसाठी मोठा साहित्यिक मेजवानी ठरला.

यावेळी साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक आसाराम लोमटे यांची प्रमुख उपस्थिती होती.


सोबतच प्रसिद्ध सिने-नाट्य दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी, मराठी साहित्य परिषदेचे राज्याध्यक्ष कौतिकराव ठाले, प्रख्यात साहित्यिक प्रकाश होळकर, मार्तंड कुलकर्णी, डॉ. राजेश गायकवाड, कुंडलिक आतकरे, ग्रामीण कथाकार राम निकम, डॉ. विनायक कोठेकर, डॉ. लोया, प्रा. शरद कुलकर्णी डॉ. सदाशिव कळमकर,प्रा. प्रदीप देशमुख, डॉ. धोंडोपंत मानवतकर, सुंदरराव चव्हाण यांच्यासह परिसरातील असंख्य साहित्यप्रेमीं उपस्थित होते. ग्रामीण जीवनाचे दर्शन घडवणाऱ्या, वास्तववादी आणि दर्जेदार कथांचा समावेश असलेल्या या कथासंग्रहाला महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अनुदान लाभले आहे. ग्रामीण संस्कृतीचे सूक्ष्म सामाजिक पैलू कथांमधून परिणामकारकरीत्या मांडण्याचा प्रयत्न डॉ.रमेश बोराडे यांनी या पुस्तकाद्वारे केलेला असून, साहित्यविश्वात त्याचे स्वागतच होईल,अशी प्रतिक्रिया यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केल्या.

या कार्यक्रमात साहित्य क्षेत्रातील वाढता कल, ग्रामीण कथनातील बदलत्या धारणा, तसेच नव्या लेखकांना मिळणाऱ्या संधी यांवरही मान्यवरांनी मार्गदर्शनात्मक विचार मांडले.

'चक्रव्यूह' बद्दल बोलताना लेखक डॉ. बोराडे यांनी सांगितले की, समाजातील गुंतागुंतीच्या नातेसंबंधांतून तयार होणारी जीवनाची चक्रव्यूही परिस्थिती कथांमधून उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रामीण माणसाचे जगणे, त्यातील संघर्ष आणि आशावादी मूल्ये यांची भावपूर्ण मांडणी ही या संग्रहाची जमेची बाजू ठरणार असल्याचे सांगितले.

दरम्यान रसिकांची दाद आणि मान्यवरांच्या शुभेच्छांनी भरलेला हा प्रकाशन सोहळा सेलूच्या साहित्य इतिहासात नोंदला जाईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

# सभासदाच्या योजना ठरल्या प्रभावी



**विशाल देशमुख**
**टेंभूर्णी -** सभासदांच्या हितासाठी राबविलेल्या विविध कल्याणकारी योजना, शिस्तबद्धपणे कर्ज वाटप कर्जवसुलाठी केलेले प्रामाणिक प्रयत्न यामुळे जाफराबाद जिल्हा परिषद शिक्षक पतसंस्था आली नावारूपास. जिजाऊ सावित्री कन्यादान योजना, सेवानिवृत्त सभासद योजना, सन्मान ठेव योजना ठरल्या प्रभावी.

सभासदांच्या हितासाठी राबविलेल्या विविध कल्याणकारी योजना, शिस्तबद्धपणे कर्ज वाटप कर्जवसुलाठी केलेले प्रामाणिक प्रयत्न यामुळे जाफराबाद येथील जिल्हा परिषद शिक्षक आणि शालेय सेवकांची सहकारी पतसंस्था ही जालना जिल्ह्यामध्ये नावलौकिक मिळवत आहे. जिल्हा परिषद शिक्षक पतसंस्था ही सर्व सभासदांचे सहकार्य आणि संचालक मंडळ यांनी केलेल्या प्रामाणिक प्रयत्नामुळे नावारूपास आली आहे.२०२३मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत सभासद पॅनल विजयी होऊन त्यावेळी १४ जानेवारी रोजी चेअरमन पदावर विनोद कळंबे, व्हॉइस चेअरमन पदावर प्रदिप ताठे तर मानद सचिव पदावर वसंता शेवाळे विराजमान झाले होते.पुढील दोन महिन्यात सभासदांच्या हितासाठी जिजाऊ सावित्री कन्यादान योजना ही अस्तित्वात आणली गेली. यामध्ये ज्या सभासदाच्या मुलीचे लग्न आहे अशा एका मुलीला ११ हजारांचा धनादेश तिच्या नावे देण्यात येतो.आजपर्यंत या योजनेचा लाभ २५ सभासद कन्याना झाला आहे.याशिवाय ५लाख रुपये १वर्षासाठी ठेवल्यावर एक चांदीचे आकर्षक नाणे ही भेट देण्यात येते.३मार्च २०२५ ठरल्या प्रमाणे तात्कालीन चेअरमन विनोद कळंबे यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त असलेल्या पदावर निवडणुकीद्वारे गणेश पवार यांची निवड करण्यात आली होती. जुलै महिन्यामध्ये तत्कालीन सचिव वसंता शेवाळे यांनी राजीनामा दिल्यामुळे संजय लोखंडे यांची या सचिव पदावर निवड झाली होती. संस्थेच्या सेवानिवृत्त होणाऱ्या सभासदांसाठी सेवानिवृत सभासद सन्मान योजना सुरू करण्यात आली असून या माध्यमातून सेवानिवृत्त झालेले सभासदास २५०० रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात येतो.मुदत ठेवीवर १० टक्के इतका व्याजदर देण्यात येत असल्यामुळे सभासद मोठ्या पद्धतीने ठेवी आपल्या हक्काच्या आणि सुरक्षित पतसंस्था असलेल्या जिल्हा परिषद शिक्षक पतसंस्थेत ठेवत आहेत. यासाठी विद्यमान चेअरमन गणेश पवार, व्हॉईस चेअरमन प्रदीप ताठे, मानद सचिव संजय लोखंडे,विनोद कळंबे,वसंता शेवाळे, दिपक चव्हाण, छाया पुंगळे,सुखदेव अवकाळे, अभिजित साळवे, संजय निकम,किरण तिडके,गणेश फुकट, सुनीता खलसे, बद्रीनाथ जायभाये, कैलास बकाल , लिंबाजी कड, अनिल भोसले प्रयत्नशील आहेत.

### महात्मा फुले पुण्यतिथीनिमित्त उद्या अभिवादन कार्यक्रम

**जालना -** महात्मा ज्योतीबा फुले पुण्यतिथीनिमित्त २८ नोव्हेंबर २०२५ रोजी जालना शहरातील महानगरपालिका शहर कार्यालयाच्या परिसरातील पूर्णाकृती पुतळा येथे सकाळी १० वाजता अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास जिल्हाधिकारी अशिमा मित्तल, उपविभागीय अधिकारी रामदास दौंड, पोलिस अधिक्षक बन्सल, खा. कल्याण काळे, आ. अर्जुनराव खोतकर, माजी आ. कैलास गोरंट्याल, माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर, भास्करराव दानवे आदिंची उपस्थित राहणार आहे. यावेळी फुले अनुयायांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# डॉल्फिन इंग्लिश स्कूल मध्ये संविधान दिन उत्साहात साजरा

**परतूर । प्रतिनिधी -** वाटूर फाटा येथील डॉल्फिन इंग्लिश स्कूल मध्ये संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दि.२६/११/१९४९ रोजी भारत देशाला संविधान अर्पण केले.हा महत्त्वाचा क्षण म्हणून ७५ वा संविधान गौरव रॅली, विद्यार्थ्यांनी काढून जनजागृती केली.यावेळी शाळेतील शिक्षक, गजानन शेळके यांनी विद्यार्थ्यांना संविधाना विषयी मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्या साठी शाळेतील



शिक्षिका,विद्या कुकडे. नसरिन सय्यद. भाग्यश्री पाटील. साधना काळे. त्रिवेणी सनईकर.गजानन शेळके. इत्यादींनी मेहनत घेतली.

# जात प्रमाणपत्र पडताळणी कडून विशेष मोहिमेचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय संविधानाला ७५ वर्ष पुर्ण झाल्यानिमित्ताने संविधान अमृत महोत्सव घर घर संविधान या कार्यक्रमाचे औचित्य साधुन जालना जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती मार्फत दि. २६ नोव्हेंबर २०२५ ते २६ जानेवारी २०२६ या कालावधीत समिती कार्यालयात विशेष मोहिम शिबिर राबविण्यात येत आहे. समिती कार्यालयात दररोज कार्यालयीन वेळेत अधिकारी व कर्मचारी तसेच अर्जदार, पालक यांच्या उपस्थितीत त्यांना संविधानाचे वाचन,भारतीय संविधानाचे महत्व याबाबत माहिती देण्यात येणार आहे. तसेच समितीने वैध करण्यात आलेल्या प्रकरणात अर्जदार यांना ऑनलाईन प्रक्रियेव्दारे जात वैधता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येणार आहे.असे जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या उपायुक्त तथा सदस्य संगीता मकरंद यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# संच मान्यतेच्या चुकीच्या धोरणाला प्राथमिक शिक्षक संघाचा विरोध

**विशाल देशमुख**
**टेंभूर्णी -** शिक्षण संचालक कार्यालयाने २० नोव्हेंबर २०२५ च्या पत्रानुसार २०२४-२५ च्या संच मान्यतेवर समायोजन करण्याचे निर्देशित केलेले आहे. परंतु २०२४-२५ ची संच मान्यतेमध्ये अनेक त्रुटी आहेत. तसेच या संच मान्यतेनुसार समायोजन करण्याअगोदर शिक्षक संवर्गातील सर्व पदांची पदोन्नती प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे. या महत्त्वाच्या बाबीचे सुद्धा पालन करण्यात आलेले नाही. या संच मान्यतेनुसार अतिरिक्त होणाऱ्या शिक्षकांची संख्या जास्त असल्यामुळे तेवढ्या जागा सुद्धा जिल्ह्यामध्ये उपलब्ध नाहीत. तसेच ही संचमान्यता ३० सप्टेंबर २०२५ रोजी कालबाह्य झालेली आहे.
३० सप्टेंबर २०२४ च्या विद्यार्थी संख्येवर आधारित ही संच मान्यता असल्यामुळे आज रोजी विद्यार्थी संख्येत बदल झालेला आहे. यामुळे विद्यार्थी संख्येनुसार शिक्षक उपलब्ध होणार नाही. व याचा अध्ययन अध्यापन प्रक्रियेवर विपरीत परिणाम होईल.
त्यामुळे २०२५-२६ च्या संच मान्यतेवर आधारित समायोजनाची प्रक्रिया राबविण्यात यावी. तसेच या अगोदर शिक्षक संवर्गातील सर्व



पदांच्या पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी. ही संच मान्यता आज रोजीच्या विद्यार्थी पटसंखेवर आधारित असल्यामुळे सर्व शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षक उपलब्ध होतील.
*यामुळे २०२४/२५ च्या संच मान्यतेवर आधारित समायोजनाची प्रक्रिया न राबवता २०२५/२६ च्या संच मान्यतेनुसार समायोजनाची प्रक्रिया राबविण्यात यावी असे आशयाचे निवेदन प्राथमिक शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद जालना यांना देण्यात आले. शिक्षण अधिकारी बैठकीनिमित्त कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे प्रशासन अधिकारी सोनवणे साहेब यांना समायोजनासह शिक्षकांच्या खालील विविध प्रलंबित मागण्यांचे निवेदन देण्यात आले.
प्राथमिक शिक्षकांच्या केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी,मुख्याध्यापक पदोन्नत्या संदर्भात राज्य शासनाकडून टीईटी आवश्यक विषयी कोणतेही पत्र नसल्यामुळे प्रलंबित पदोन्नत्या तात्काळ करण्यात याव्यात.
इ. गव्हर्नर्स प्रणालीमुळे प्राथमिक शिक्षकांच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या संचिका थांबविण्यात आलेल्या आहेत त्या तात्काळ निकाली काढण्यात याव्यात.
प्राथमिक पदवीधारातून मुख्याध्यापक पदी पदोन्नत शिक्षकांना एक अतिरिक्त वेतन वाढ देण्याच्या पत्राची अंमलबजावणी करण्यात यावी.
सर्वच प्राथमिक पदवीधर शिक्षकांना न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून वेतनश्रेणी देण्यात यावी.
सातव्या वेतन आयोगातील वेतन त्रुटी दूर करण्याच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे पत्र आपल्या स्तरावर निर्गमित करण्यात यावे.
यावेळी प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब जुंबड तसेच प्राथमिक शिक्षक संघाचे सरचिटणीस दिलीप जायभाये, पदाधिकारी सुभाष भडांगे, मंता फुके, सुधाकर पवार, प्रमोद पवार, गौतम ढवळे, सुखदेव खरात, माधव भोसले, मनोज जुंबड, सुदर्शन भुतेकर तसेच सहकारी शिक्षक यशवंत मोरे, गणपत शेळके, रामेश्वर मोरे इत्यादी उपस्थित होते.

# यळकोट यळकोटच्या जयघोषात देवगाव नगरी दुमदुमली



**मंठा । प्रतिनिधी -** मंठा तालुक्यातील देवगाव खवणे नगरी येथील पुरातन श्री खंडोबा मंदिरात चंपाषष्ठी उत्सव मोठ्या सोहळ्यात पार पडला. दिनांक २१ नोव्हेंबर (शुक्रवार) रोजी विधिवत घटस्थापना करण्यात आली. उत्सव काळात दररोज सकाळी व सायंकाळी सात वाजता आरतीने मंदिर परिसर दुमदुमून गेला.

बुधवार, २६ नोव्हेंबर रोजी चंपाषष्ठी निमित्त घटोत्थापन झाल्यानंतर मानकरी भगवानराव कुलकर्णी यांच्या घरून श्री खंडेरायाची पालखी मिरवणूक निघाली. मारुती मंदिरापर्यंत झालेल्या या मिरवणुकीत संतोष खवणे (देवगाव) व भास्कर गवळी (केहाळ-वडगाव) यांच्या मानाच्या काठ्या शोभा वाढवित होत्या.

'येळकोट येळकोट जय मल्हार'च्या गर्जनांनी वातावरण भारावून गेले होते. भाविकांनी खोबरे व भंडाऱ्याची उधळण करत खंडोबाचे जयघोष करत सहभाग नोंदविला.

मंदिर परिसरात आगमनानंतर बाजरी भाकरी व वांग्याच्या भरीताचा नैवेद्य अर्पण करून खंडोबाचे पारंपरिक पद्धतीने लग्न लावण्यात आले. त्यानंतर भाविकांना प्रसाद वाटप करण्यात आला. रात्री जागरण कार्यक्रमात खंडोबाची भक्तिगीते सादर करण्यात आली. दरम्यान, नवसाची गाडी ओढण्याचा कार्यक्रमही पार पडला. यावेळी तरुण स्वयंसेवकांनी श्रमदान करत व्यवस्था सुरळीत सांभाळली. संपूर्ण यात्रा उत्सव भक्तिमय वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला.

**यात्रेत भाविकांची मोठी गर्दी**

चंपाषष्ठी निमित्त मंदिर परिसरात भरलेल्या यात्रेला भाविकांची मोठी गर्दी झाली होती. घसरगुंडी, जंपिंग जपांग, उंच व गोल फिरणाऱ्या हातपाळणा आदी खेळण्यांवर मुलांचे आकर्षण पाहण्यासारखे होते. मिठाई, खेळणी आणि विविध साहित्यांची दुकाने भाविकांच्या गर्दीने चांगलीच फुलली होती. अबालवृद्धांनी उत्साहाने हजेरी लावत यात्रेचा आनंद लुटला.

# भारतीय संविधान दिनानिमित्त उद्देशिकाचे सामुहिक वाचन

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय संविधान दिन हा जिल्हाधिकारी कार्यालयात अत्यंत उत्साहाने साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रमात अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांनी उपस्थितांसह भारतीय संविधानाच्या उद्देशिकाचे सामूहिक वाचन केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी सुकेशिनी पगारे, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांची प्रमुख उपस्थिती होती. नागरिकांमध्ये घटनात्मक मूल्यांना प्रोत्साहन देणे आणि संविधानाबद्दल जनजागृती करणे हा संविधान दिन साजरा करण्यामागचा मुख्य उद्देश आहे. २६ नोव्हेंबर १९४९ मध्ये आजच्या दिवशी भारताच्या संविधान सभेने संविधान स्वीकारले होते. हा दिवस संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अमूल्य योगदानाला समर्पित आहे. अपर जिल्हाधिकारी मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता या मूलभूत मूल्यांप्रति आपली निष्ठा आणि वचनबद्धता यावेळी व्यक्त केली. भारताचे संविधान हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान असून, ते देशाच्या लोकशाहीचा आधारस्तंभ आहे. या कार्यक्रमातून संविधानाने दिलेल्या हक्कांसोबतच मूलभूत कर्तव्यांची जाणीव ठेवून देशाची एकात्मता आणि अखंडता कायम राखण्याचा संकल्पही सर्वांनी यावेळी केला. याप्रसंगी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पापळ येथे युनायटेड ग्लोबल फेडरेशनचा शालेय बॅग वितरण उपक्रम

**विशाल देशमुख**
**टेंभूर्णी -** युनायटेड ग्लोबल फेडरेशन तर्फे राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक सहाय्य मोहिमेअंतर्गत आज जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पापळ (ता. जाफ्राबाद) येथे इयत्ता १ ते ४ वीतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत शालेय बॅगचे वितरण करण्यात आले. महाराष्ट्रभरातील ३००० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचलेल्या या उपक्रमाचा हा आणखी एक यशस्वी टप्पा ठरला आहे.या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन मिळावे आणि सामाजिक जबाबदारी जपली जावी हा उद्देश संस्थेने ठेवला असून या वितरणावेळी विद्यार्थ्यांमध्ये उत्साह आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले कार्यक्रमादरम्यान युनायटेड ग्लोबल फेडरेशन चे दुर्गेश विष्णू बनकर, विशाल नवले, अनुराग जाधव, संकेत नवले, ज्ञानेश्वर शास्त्री सर, समाधान नवले, कुलदीप नवले, उमेश गिराम, नामदेव मोरे आणि प्रेमानंद जाधव उपस्थित होते.शाळेचे मुख्याध्यापकांनी सर्व मान्यवरांचे स्वागत करत संस्थेच्या सामाजिक बांधिलकीचे विशेष कौतुक केले. तसेच शिक्षकांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि शैक्षणिक प्रगती सकारात्मक दिशेने वाढत असल्याचे सांगितले.











**जालना शहरात लहान मुलांसाठी खेळण्यासाठी छत्रपती संभाजी उद्यान हे एकमेव आहे. या ठिकाणी असलेली अनेक खेळणी तुटलेल्या अवस्थेत असल्याने या ठिकाणी विरंगुळ्यासाठी येणाऱ्या बच्चे कंपनीचा हिरमुड होत असून याकडे तात्काळ लक्ष देण्याची मागणी होत आहे. (छायाचित्र - किरण खानापुरे)**

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.